# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२०२५५५ / २० /अ.क्र.२६८५ /२६**

श्री.जाहिद हुसेन इद्रीसी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा विभाग निरीक्षक (शाळा)
खाजगी प्राथमिक शाळा विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका, शिक्षण विभाग,
उपशिक्षणाधिकारी (खाजगी प्राथमिक शाळा विभाग) यांचे कार्यालय,
भांतेवाडी, एम.टी.एम.एल. ऑफिस जवळ,
प्रगती विद्यालया शेजारी, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक/विभाग निरिक्षक (शाळा) खाप्राशा अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका, शिक्षण विभाग,
उपशिक्षणाधिकारी (खाजगी प्राथमिक शाळा),
त्रिवेणी संगम म.न.पा. शालेय इमारत,
४ था मजला, महादेव पालव मार्ग, करिरोड (पू.) मुंबई ४०० ०१२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०३.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६.११.२०१९ | ०२.१२.२०१९ | १६.१२.२०१९ | २२.०१.२०२० |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी दाखल केलेल्या जोडपत्रानुसार दि.१६/०८/२०१० रोजी उपशिक्षणाधिकारी यांनी जे पत्रक काढले आहे त्यामध्ये अंजुमन ए अस्लाम अल्लाना इंग्लिश प्रायमरी स्कूल, ९२ डी एन रोड, सी एस टी एन येथील अंजुमन ए अस्लाम अल्लाना इंग्लिश प्रायमरी स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे इयत्ता पहिली ते चौथीचे वर्ग हे व्यवस्थापक मंडळाच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्ये भरतात असे उपशिक्षणाधिकारी परिमंडळ-१ यांच्या पत्रात नमूद केले असल्याने दि. ०१/०६/२००५ ते पूर्ण माहिती मिळण्याच्या दिनांकापर्यंत अपिलार्थीनी सदर शाळेच्या मालकी इमारती संदर्भात विभागास संस्थेने सादर केलेल्या मालकी हक्काची कागदपत्रे यांची छायांकित प्रत तसेच पहिली ते चौथी चे वर्ग कुठल्या इमारतीमध्ये, कोणत्या मजल्यावर,

कोणत्या खोलीत चालू केले आहे व होते यासंदर्भात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती प्रदान करण्याविषयी आग्रही विनंती केलेली आढळून येते.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभाग निरीक्षक शाळा, खाजगी प्राथमिक शाळा विभाग श्री.नासिर अली याकुब अली शेख यांनी दि. ०२/१२/२०१९ रोजीच्या उत्तरात अर्जात नमूद अंजुमन ए अस्लाम अल्लाना इंग्लिश प्रायमरी स्कूल ही शाळा कायम विनाअनुदानित व अल्पसंख्यांक असल्याकारणाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील **कलम २ (च)** प्रमाणे उपरोक्त अधिनियम लागू होत नसल्याने अर्ज निकाली काढला असल्याचे सूचित करण्यात आले. त्याविरुद्ध अपिलार्थीनी दि. १६/१२/२०१९ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केला असून त्यावर तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, खाजगी प्राथमिक शाळा, श्री.बापूराव मोरे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांनी घेतलेली भूमिका म्हणजेच **कलम २ (च)** प्रमाणे उपरोक्त शाळा ही सार्वजनिक प्राधिकरण नसल्याचे तसेच ती कायम विनाअनुदानित व अल्पसंख्यांक असल्याकारणाने वरील कायदा लागू होत नसल्याचे उत्तर दिले असून त्याविरुद्ध अपिलार्थीनी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीत प्राधिकरणाच्या वतीने कोणीही हजर नाहीत. तथापि, अपिलार्थींनी उपरोक्त इमारत ही अंजुमन ए अस्लाम यांच्या मालकीची असून तेथे अनुदानित व विनाअनुदानित अशा दोन्ही प्रकारच्या शाळा व त्यांचे वर्ग भरत असून मागितलेली माहिती ही मुळातच त्यांनी शाळेला अथवा संस्थेला मागितलेली नाही, तर ती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे संबंधित संस्थेने दाखल केलेल्या कागदपत्रांशी संबंधित असून उपरोक्त कागदपत्रे ही सार्वजनिक स्वरूपाची असून **कलम २ (च) २ (ज) व २ (त्र)** याप्रमाणे उपरोक्त माहिती देय असल्याचे यात नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व पारित केलेला आदेश माहिती अधिकार अधिनियमाशी पूर्णतः विसंगत असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. **कलम २ (च)** प्रमाणे माहिती या शब्दाचा अर्थ दिला असून यात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकषाची संबंधित माहिती याचा समावेश असून **कलम २ (झ) व २ (त्र)** प्रमाणे अभिलेख तसेच माहितीचा अधिकार याची व्याख्या केली असून कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली व त्यांच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमांन्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळण्याचा अधिकार असे वर्णन केले असून त्यात दस्तऐवज, अभिलेख व इतर अनेक बाबींचा समावेश आहे. तसेच या प्रकरणी संबंधित शाळा अथवा तिचा कायम विनाअनुदानित प्राथमिक विभाग हा माहिती अधिकाराचा विषय नसून ज्या इमारतीत शाळा भरते त्या संदर्भात संबंधित संस्थेने महानगरपालिकेला सादर केलेली कागदपत्रे हा माहिती अधिकाराचा विषय असून उपरोक्त माहिती ही माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये देय

असल्याचे व अशी माहिती प्रदान करणे हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाला बंधनकारक असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते.

ही बाब लक्षात घेता प्रस्तुत अपील अर्ज अंशतः मंजूर करीत तसेच अपिलीय अधिकाऱ्यांचा दिनांक २२/०१/२०२० रोजीचा आदेश रद्दबातल ठरवीत अपिलार्थींच्या दि.१६/११/२०१९ रोजी दाखल केलेल्या जोडपत्रामधील नमूद दोन्ही मुद्यांशी संबंधित म्हणजे शाळेच्या मालकी इमारती संबंधित सादर केलेली कागदपत्रे व नकाशाची प्रत ही अपिलार्थींना आहे त्या स्थितीत **कलम २ (च)** प्रमाणे **विनामूल्य** देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २४-०३-२०२६**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra